स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत भूगोल विषयातील पी.एच.डी.
(विद्या वाचस्पती) या पदवी करिता

:: शीर्षक ::

“परभणी जिल्हयातील परभणी व गंगाखेड तालूक्यातील साक्षरता आणि व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास"

:: संशोधकाचे नाव ::
मिलिंदकांत भिमराव मोरताटे
(एम.ए.बी.एड., एम.फील)

:: मार्गदर्शकाचे नाव ::
डॉ.हनुमंत गांधले
(एम.ए.नेट, पी.एच.डी.)
(भूगोल विभाग)
बी.रघुनाथ महाविद्यालय, परभणी ता. जि.परभणी

भूगोल संशोधन केंद्र

महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर जि.लातूर

“परभणी जिल्हयातील परभणी व गंगाखेड तालूक्यातील साक्षरता आणि व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास"

प्रस्तावना:-

'भूगोल' हा प्राचीन विषय आहे. अगदी प्रारंभिक अवस्थेत 'भूगोल' म्हणजे पृथ्वीचे वर्णन करणारे शास्त्र अशी व्याख्या केली होती. पृथ्वीवर ज्या ज्या गोष्टी मानवाला आढळल्या त्या सर्वाचे निरीक्षण करून मानवाने त्यांच्या नोंदी केल्या व तेथुनच भूगोलाची सुरूवात झाली.

'लोकसंख्या भूगोल' ही मानवी भूगोलाचीच नव्याने उदयास आलेली एक उपशाखा आहे. लोकसंख्या किंवा मानवी समुह हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सर्वात महत्तवाचा घटक आहे. मानवाकडे आलेली बौध्दीक क्षमता, कल्पकता, दुरदृष्टी, श्रम करण्याची प्रवृत्ती, शास्त्रीय तांत्रिक ज्ञान इत्यादी. गुणांमुळे तो विविध साधनांची निर्मिती करतो. आपले जिवन सुखी व समृध्द करण्याचा प्रयत्न करतो म्हणुन मानवास एक प्रमुख भौगोलिक अभिकर्ता म्हणून संबोधले जाते.

इ.स.1953 मध्ये जी.टी. त्रिवार्था यांनी अमेरिकन भूगोल तज्ञांच्या परिषदेमध्ये लोकसंख्या भूगोलास मानवी भूगोलाची एक स्वतंत्र शाखा म्हणून मान्यता देण्यासंबंधी भूगोल ताज्ञांना आवाहन केले. लोकसंख्या भूगोलास भूगोलाची एक महत्वपूर्ण शाखा म्हणून विकसित करण्याचे कार्य जी.टी. त्रिवार्थानी केलेले असल्यामुळे त्यांना लोकसंख्या भूगोलाचे जनग या नावाने संबोधले जाते.

लोकसंख्या भूगोलात प्रामुख्याने पृथ्वीवरील लोकसंख्या या घटकाचा अभ्यास केला जातो. लोकसंख्येच्या वितरणावर विविध घटक परिणाम करतात. त्यामध्ये जन्मदर, मृत्यूदर, साक्षरता या घटकाचा समावेश होतो.

साक्षरता हे सांस्कृतिक विकासाचे एकमेव पुर्वाभिमुख साधन असुन ते सामाजिक व आर्थिक विकासावर प्रभावकारी ठरणारा महत्वपूर्ण घटक आहे.त्यामुळे वर्तणूक, नैतिकता आणि सामाजिक जाणीव वृध्दींगत होते. साक्षरतेमुळे अंतरराष्टीय संबंध हे मैत्रीपुर्ण व शांततामय राहतात.

साक्षरता एखाद्या प्रदेशाच्या विकासाचे प्रतिबिंब असते. कारण साक्षरतेमुळे परस्परातील सामाजिक संबंध वृध्दींगत होतात. त्यामुळे आर्थिक, सामाजिक राहणीमानाचा दर्जा वाढतो.तसेच दरिद्रता घटवण्याचे उत्तम साधव आहे. साक्षरतेमुळे अंतरराष्टीय संबंध हे मैत्रीपूर्ण व शांततामय राहतात. तसेच एखादया समाजात किंवा प्रदेशात साक्षरतेचे प्रमाण जास्त असेल तर जन्मदर, कमी आढळून येतो. साक्षतेमुळेअंधविश्वास व गरीबी दूर होण्याची शक्यता जास्त असते. विश्वबंधुत्वाची भावना वाढीस लागण्यास मदत होते.

मानवाद्वारे केल्या जाणा-या आर्थिक कियेस 'व्यवसाय" असे म्हणतात. व्यवसायिक रचना ही श्रमजीवी लोकांच्या दृष्टीने अतिशय महत्तवाची असते. व्यवसायिक रचनेच्या अभ्यासामुळे व्यापार, धंदा व इतर आर्थिक कामात किती व्यक्ती गुंतल्या आहेत याबदल माहिती मिळते. लोकसंख्या भूगोलात व्यावसायिक रचनेचा अभ्यास हा महत्तवपूर्ण आहे. व्यवसायाचे सर्वसाधारणपणे पाच प्रकारात वर्गीकरण केले जाते. प्राथमिक व्यवसाय, द्वितीय व्यवसाय, तृतीय व्यवसाय आणि पंचम व्यवसायाचा समावेश होतो.

परभणी व गंगाखेड तालुक्यातील खक्षरता व व्यवसायिक रजचनेचा अभ्यास करताना इ.स.2001 ते 2021 या दरम्यानचा जवळपास 20 वर्षाचा कालावधी घेण्यात आलेला आहे.

अभ्यास क्षेत्रः-

महाराष्ट्र राज्याच्या नकाशामध्ये राज्यातील दख्खनच्या पठारावरील मराठावाडा विभागातील आठ जिल्हयापैकी परभणी हा एक जिल्हा आहे.

जिल्हयाचे एकुण क्षेत्रफळ 6214 चौ. किमी.आहे.

स्थान मराठवाडा विभागात, महाराष्ट्राच्या आग्रेय भागात.

विस्तार - 19° 30′ उत्तर अक्षांश ते 76° 45' पुर्व अक्षांश तर रेखावृत्तीय विस्तार

19°.500' उत्तर रेखांश ते 76°.750' पुर्व रेखांश आहे. ज्याच्या चतूःसिमा-

पुर्वेस _________नांदेड जिल्हा

पश्चिमेस_______बिड व जालना जिल्हा

दक्षिणेस_______लातूर व बिड जिल्हा

उत्तरेस________हिंगोली जिल्हा

एकुण लोकसंख्या - 1836086 (2011) आहे. यामध्ये पुरुष लोकसंख्या 942870 एवढी असुन स्त्री लोकसंख्या ही 893216 एवढी आहे. लोकसंखेची घनता 295 प्रति चौ.कि.मी.आहे आणि लिंगगुणोत्तर प्रमाण 947 आहे. तसेच पुरुष साक्षरता दर 82.64 टक्के तर स्त्री साक्षरता दर 63.36 टक्के आहे.

परभणी तालुका -लोकसंखेच्या दृष्टीने (2011) सर्वात मोठा तालुका आहे.या तालुक्याचे एकुण क्षेत्रफळ 1161.6 चौ.कि.मी. असुन या तालुक्यामध्ये गावाची एकुण संख्या 128 आहे.

गंगाखेड तालुका क्षेत्रफळाच्या दृष्टीने परमणी जिल्हयातील गंगाखेड तालुक्याचा चौथा कमांक लागतो. याचे एकुण क्षेत्रफळ 671.2 चौ.कि.मी.असुन या तालुक्यामध्ये गावांची संख्या 105 आहे.

गृहीतकेः-

1. साक्षरतेवर व व्यावसायिक रचनेवर विविध घटाकांचा परिणाम होतो.

2. साक्षरतेत व व्यासायिक रचनेत समानता आढळुन येत नाही.

3. साक्षरतेत व व्यासायिक रचनेत स्थल व काल सापेक्ष परिवर्तन होते.

अभ्यासाची उदिष्टे:-

प्रस्तुत संशोधन पुर्ण करण्यासाठी संधोकाने खालील उदिष्टे डोळयासमोर ठेवली आहेत.

1. साक्षरतेचे व व्यावसायिक रचनेचे महत्व जाणून घेणे.

2. साक्षरतेवर व व्यावयायिक रचनेवर परिणाम करणा-या घटकांचा अभ्यास करणे.

3. साक्षरतेचे व व्यावसायिक रचनेचे बदलते स्वरुप अभ्यासणे.

4. परभणी व गंगाखेड तालुक्यातील एकुण साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.

5. परभणी व गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.

6. परभणी व गंगाखेड तालुक्यातील नागरी साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.

7. परभणी व गंगाखेड तालुक्यातील अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, ओबीसी व खुला प्रवर्ग जातीतील साक्षरतेचा व व्यवसायिक रचनेचा अभ्यास करणे.

माहितीस्त्रोत व संशोधन पद्धतीः-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक स्वरुपाच्या माहितीसाठी प्रस्तुत दोन तालुक्यातील नमुना निवड पध्दती सर्वेक्षण करुन मुलाखत तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. दुय्यम स्वरुपाची आकडेवारी प्राप्त करण्यासाठी जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, जनगणना पुस्तिका, विविध संशोधन प्रत्रिका व इंटरनेटचा उपयोग करण्यात येणार आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मिळविण्यात आलेल्या प्राथमिक द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध तक्ते व आलेखाच्या साहयाने करण्यात येणार आहे.त्या करिता सांख्यिकीय पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. त्याकरिता अभ्याससक्षेत्रातील लोकसंख्येची साक्षरता दर्शविण्यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$\text{साक्षरता} = \frac{\text{एकुण साक्षर लोक}}{\text{एकुण लोकसंख्या}} \times 100$$

वरील सुत्राच्या आधारे एकुण लोकसंख्येपैकी किती टक्के लोक साक्षर आहेत हे दर्शविले जाते. परभणी व गंगाखेड तालुक्यातील व्यावयायिक रचनेचा अभ्यास करतांना प्राथमिक आर्थिक व्यवसाय, द्वितीय आर्थिक व्यवसाय व तृतीय आर्थिक व्यवसायाचे शहरी व ग्रामीण वर्गीकरण करण्यात येणार आहे.

तसेच लोकसंख्या व साक्षरता काढण्यासाठी स्पिअरमन रॅंक सहसंबंध पध्दतीने काढण्यात येणार आहे. यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$r = 1 - \left[\frac{6\sum d^2}{n^3 - n} \right]$$

<u>अभ्यासक्षेत्राची निवडः-</u>

परभणी जिल्हयातील कृषि क्षेत्राची प्रगती लक्षणीय असली तरी जिल्हयाचा औद्योगिक विकास प्रारंभिक अवस्थेत आहे. खनिज द्रव्य व नैसर्गिक साधन संपत्तीच्या अभावामुळे मूलभूत जड उदयोग स्थापन झाले नाहीत तसेच मुंबई, पुणे यासारख्या औद्योगिकदृष्ट्या विकसित क्षेत्रापासुन जिल्हा दुर अनंतरावर आहे.त्यामुळे साहयभुत व इतर उदयोग निर्माण झालेले आहेत. जिल्हयात आलेल्या उदयोगामध्ये कापूस जिनिंग मिल्स, दाळ मिल्स, तेल गिरण्या या प्रकिया उदयोगांचा मोठा वाटा आहे. जिल्हयात चार साखर कारखाण्यातून साखरेचे उत्पादन केले जाते.

<u>साहित्याचे पुनरावलोकनः-</u>

सदरील विषय अभ्यासाकरिता निश्चित करण्याअगोदर खालील साहित्याचा आढावा घेतलेला आहे.

1. डॉ.दुधाटे एस.बी. (2013) :-

यांनी औरंगाबाद जिल्हयातील लोकसंख्या व कृषी भूमीउपयोजनाचा भौगोलिक अभ्यास या घटकावर संशोधन केलेले आहे.

2. डॉ.गायकवाड यु.टी. (2009) :-

यांनी नांदेड जिल्हयातील अनुसूचित जाती व जमाती या दोन घटकातील लोकसंख्या विषयक विविध घटकावर संशोधन केलेले आहे.

3. डॉ.अष्टुरे एस.बी. (2009) :-

यांनी औरंगाबाद जिल्हयातील लोकसंख्येची वैशिष्टये व अन्नधान्य संसाधन या दोन घटकाच्या सहसंबंधाचा अभ्यास केलेला आहे.

4. डॉ. चंदना आर.सी. (2007) :-यांनी लोकसंख्येची वैशिष्टये, घटक, संकल्पना आणि पद्धती यांचा अभ्यास केला आहे.

5. प्रा.दास एम.एम. (2006) :- यांनी ईशान्य भारतातील लोकसंख्या वाढ व अन्नधान्य उत्पादन या दोन घटकाचा सखोल अभ्यास केलेला आहे.

6. डॉ.हसन एम.आय. (2005) :-यांनी भारतातील लोकसंख्येचे विविध घटक व त्यावर प्रभाव करणारे भौगोलिक घटक यावर सखोल संशोधन केलेले आहे.

<u>**प्रकरण रचना**</u>

प्रकरण पहिलेः प्रस्तावना

1.1 प्रस्तावना

1.2 लोकसंख्या भूगोलाचा अर्थ व व्याप्ती

1.3 अभ्यासक्षेत्राची निवड

1.4 उदिष्टये

1.5 माहितीस्त्रोत व संशोधन पद्धती

1.6 साहित्याचे पुनरावलोकन

1.7 प्रकरणांची रुपरेषा

प्रकरण दुसरेः अभ्यासक्षेत्राची भौगोलिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी

अ) अभ्यासक्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी

2.1 प्रस्तावना

2.2 स्थान, विस्तार व सिमा

2.3 ऐतिहासिक पार्श्वभूमी

2.4 प्राकृतिक रचना

2.5 नदीप्रणाली

2.6 हवामान

2.7 नैसर्गिक वनस्पती

2.8 मृदा

2.9 खनिजे

ब) अभ्यासक्षेत्राची सांस्कृतिक पार्श्वभूमी

2.10 लोकसंख्या

2.11 भूमीउपयोजन

2.12 जलसिंचन

2.13 वाहतूक व संदेशवहन

2.14 कृषी साधने

2.15 औद्योगिकीकरण

प्रकरण तिसरेः साक्षरता व व्यावयायिक रचना

3.1 प्रस्तावना

3.2 साक्षरतेच्या व्याख्या

3.3 साक्षरतेवर परिणाम करणारे घटक

3.4 साक्षरतेचे महत्व

3.5 व्यावसायिक रचनेच्या व्याख्या

3.6 व्यावसायिक रचनेवर परिणाम करणारे घटक

3.7 व्यावसायिक रचनेचे महत्व

प्रकरण चौथेः परभणी व गंगाखेड तालुक्यातील साक्षरता आणि व्यावसायिक रचना

4.1 प्रस्तावना

4.2 परभणी व गंगाखेड तालुक्यातील साक्षरतेचे सर्वसामान्य वितरण

4.3 परभणी व गंगाखेड तालुक्यातील साक्षरता 2001

4.4 परभणी व गंगाखेड तालुक्यातील साक्षरता 2011

4.5 परभणी व गंगाखेड तालुक्यातील साक्षरता 2021

4.6 परभणी व गंगाखेड तालुक्यातील व्यावसायिक रचनेचे सर्वसामान्य वितरण

4.7 परभणी व गंगाखेड तालुक्यातील व्यावसायिक रचना 2001

4.8 परभणी व गंगाखेड तालुक्यातील व्यावसायिक रचना 2011

4.9 परभणी व गंगाखेड तालुक्यातील व्यावसायिक रचना 2021

प्रकरण पाचवेः परभणी व गंगाखेड तालुक्यातील साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास

5.1 प्रस्तावना

5.2 परभणी व गंगाखेड तालुक्यातील एकुण साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास

5.3 परभणी व गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास

5.4 परभणी व गंगाखेड तालुक्यातील नागरी साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास

5.5 परभणी व गंगाखेड तालुक्यातील अनुसूचीत जातीतील साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास

5.6 परभणी व गंगाखेड तालुक्यातील अनुसूचीत जमातीतील साक्षरतेचा तुलनात्मक

5.7 परभणी व गंगाखेड तालुक्यातील ओबिसी प्रवर्ग साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास

5.8 परभणी व गंगाखेड तालुक्यातील खुल्या प्रवर्गातील साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास
5.9 परभणी व गंगाखेड तालुक्यातील एकुण व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास
5.10 परभणी व गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास
5.11 परभणी व गंगाखेड तालुक्यातील अनुसूचीत जातीतील व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास
5.12 परभणी व गंगाखेड तालुक्यातील अनुसूचीत जामातीतील व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास
5.13 परभणी व गंगाखेड तालुक्यातील ओबीसी प्रवर्गातील व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास
5.14 परभणी व गंगाखेड तालुक्यातील खुल्या प्रवर्गातील व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास

प्रकरण सहावेः क्षेत्र अभ्यास

6.1 प्रस्तावना
6.2 अभ्यास क्षेत्रातील प्राकृतिक विभाग
6.3 निवडक गावातील स्थान
6.4 लोकसंख्येच्या साक्षरतेची व व्यावसायिक रचनेची वैशिष्टये
6.5 सारांश

प्रकरण सातवेः निष्कर्ष, समस्या व उपाययोजना

1.1 प्रस्तावना
1.2 निष्कर्ष
1.3 समस्या
1.4 उपाययोजना

संदर्भग्रंथः

1. प्रा. दाते व सौ. दाते (2002): प्राकृतिक भू-विज्ञान, अनिरुद्ध पब्लिशिंग हाउस, 2002 पृष्ठ क.11-12

2. डॉ. घारपुरे सामाजिक व सांस्कृतिक भूगोल

3. शर्मा के.के.(2005) संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टीकोन (खंड-4) इंटलेक्चुअल बुक ब्युरो, भोपाळ,

4. डॉ.शेटे, डॉ. फुले, डॉ.शहापुरकर (1998): लोकसंख्या भूगोल, विद्याभारती प्रकाश, लातूर, 1998. पृष्ठ क.8-9.

5. परभणी जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन.

6. परभणी जिल्हा गॅझेटीयर.

7. Mukerji A.B.(1968): "Spatial Pattern of Literacy In Andhra Pradesh, India", Sellected Papers 21, International Geographical Congress.

8. Visaria Pravin (1971): "The Sex Ratio of Population In India, "Census Monograph No. 10.New Delhi.

9. Trewarth G.T.(1969): "A Geography of Population World Pattern, "John Wiley and Sons, New York.

संशोधक
मिलिंदकांत भिमराव मोरताटे
रा.कापसी पो.केरवाडी
ता.पालम जि.परभणी

मार्गदर्शक
डॉ. हनुमंत गांधले
बी.रघुनाथ माविद्यालय परभणी.